सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
# अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५.

दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८२ E-mail : gcoeara@gmail.com Web-Site : www.gcoeara.ac.in
(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)

जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२४/2296 दि. 12 AUG 2024

## विद्यार्थ्यासाठी परीक्षा अर्ज भरणेबाबत महत्वाची सुचना

संदर्भ-:1. सा.फु.पुणे विद्यापीठ यांचे दि.30/07/2024 रोजीचे परीक्षा अर्ज भरणेबाबत प्रदर्शीत वेळापत्रक
2.कार्यालयाची सुचना क्र.शाअवसंमअ/विवि/2024/1222, दि.03/08/2024

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये महाविद्यालयातील व्दितीय/तृतीय/चतुर्थ वर्षात (SE/TE/BE) प्रवेशित तसेच (YD) असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष 2024-25 चे प्रथम सत्र Oct/Nov-2024 चे परीक्षा अर्ज भरून घेणे **दि.30/07/2024** पासुन सुरू झालेले आहे. त्याबाबत संदर्भ क्र. 2 अन्वये विद्यार्थ्यांना सुचित केलेले आहे. तरीही अद्यापपर्यंत काहीच विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरलेले आहेत. तरी सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संकेतस्थळावर जावून Online पध्दतीने परीक्षा अर्ज भरावा. परीक्षा अर्ज भरण्यापुर्वी **Audit Course/Elective/Honours** विषयाबाबत संबंधित विभागाच्या मार्गदर्शनाने परीक्षा अर्ज भरावेत व त्यावर संबंधित शिक्षकाची सही घ्यावी. तसेच परीक्षा अर्जासोबत **SBI Collect** वर जावून परीक्षा फी भरावी व त्याची पावती आणि मागील वर्षीच्या सर्व गुणपत्रिका तसेच शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये प्रवेश घेतल्याची **SBI Collect** वर Fee भरल्याची पावती. नंतर सदर अर्ज विद्यार्थी विभागाकडून तपासून तसेच रोखपाल कडून फी ची पावती तपासुन सदर परीक्षा अर्ज डी.पी.यु. या विभागात **दिनांक 14/08/2024** पर्यंत जमा करावा. विद्यार्थीनी यांनी परीक्षा अर्जासोबत बॅकेचे पासबुकच्या पहील्या पानाची व आधार कार्डच्या पहिल्या पानाची साक्षांकीत प्रत जोडावी.

तरी व्दितीय/तृतीय/चतुर्थ वर्षात प्रवेशित तसेच (YD) विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून दिलेल्या विहित मुदतीत **दिनांक 14/08/2024** पर्यंत परीक्षा अर्ज भरून सादर करावा. अन्यथा विद्यापीठाकडून Late Fee लागू झाल्यास ती भरण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील. तसेच परीक्षा अर्ज न भरल्यास होणा-या शैक्षणिक व आर्थिक नुकसानिस संबंधित विद्यार्थी जबाबदार असेल, तसेच College login मधून Exam form Confirm होणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही. याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

12-8-24
(डॉ. दि.रा.पानगव्हाणे)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द) ता.आंबेगाव जि.पुणे

प्रत-1. विभागप्रमुख- अणुविद्यूत/ उपकरणीकरण /संगणक /स्वयंचल / स्थापत्य /यंत्र /उपयोजित /कर्मशाळा यांनी सदर सुचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून तसे सुचित करावे.
2. डी.पी.यु.यांनी सदर सुचना सर्व विभागप्रमुखांना मेल करावी. संकेतस्थळावर प्रदर्शित करावी.